| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | २६.१२.२०२३. |
| नोंदणी दिनांक | : | २६.१२.२०२३. |
| निकाल दिनांक | : | १३.०८.२०२६. |
| कालावधी | : | वर्ष ०२ महिने ०७ दिवस १८ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.१, कुरुंदवाड, जि. कोल्हापूर यांचे न्यायालयात.**

**(पिठासीन अधिकारी – श्री. बाळासाहेब श्री. गायकवाड)**

**प्रपत्र क्र.३२ भाग 'अ'**

**[ फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(i) ]**

| | |
|---|---|
| MHKO180009862023 | (जाहीर दिनांक – १३.०८.२०२६)<br>**नियमित फौजदारी खटला क्र.८५/२०२३.**<br>CNR No. MHKO18-000986-2023.<br>**निशाणी क्र.५०.** |
| **गुन्ह्याचा तपशिल** | पोलीस ठाणे, कुरुंदवाड गुन्हा क्र.३३५/२०२३,<br>भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ व ५०४. |
| **अभियोगपक्ष** | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस ठाणे, कुरुंदवाड |
| **अभियोगपक्षातर्फे** | **सु.रा.मिरजे, विद्यमान विशेष सहा. सरकारी अभियोक्ता.** |
| **आरोपी** | **अरुण धनपाल चव्हाण,**<br>वय : ३३ वर्षे, व्यवसाय : शेती,<br>रा. टाकळीवाडी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर. |
| **आरोपीतर्फे** | **श्रीमती ध.अ.माने, विद्यमान वकील.** |

**भाग 'ब'**

**[फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(ii)]**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | ०४.११.२०२३ |
| प्रथम खबरी अहवाल तारीख | ०४.११.२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २६.१२.२०२३ |
| दोषारोप निश्चित तारीख | ०२.०७.२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०२.०७.२०२४ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | -- |
| न्यायनिर्णयाची तारीख | १३.०८.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | -- |

**आरोपीचा तपशिल**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | दोषारोप ठेवलेले अपराध | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | फौ.प्र.सं.कलम ४२८ करीता संपरिक्षे दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अरुण धनपाल चव्हाण | - | १४.०२.२०२४ | भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ व ५०४. | निर्दोष | — | — |

**प्रपत्र क्र.३२ भाग 'क'**

**[फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(iii)]**

**सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ. सरकारी**

| **क्र.** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|---|
| १. | गोपीनाथ आप्पासाहेब गोरे | तक्रारदार | ३५ |
| २. | निता गोपीनाथ गोरे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ३७ |
| ३. | नंदकुमार जयसिंग पाटील | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ३९ |
| ४. | स्वप्नील आप्पासो कांबळे | पंच | ४१ |
| ५. | संभाजी पुंडलिक शिंदे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ४३ |
| ६. | डॉ. आदेश संजय गायकवाड | वैद्यकिय अधिकारी | ४५ |

**ब. बचावाचे साक्षीदार**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|---|
| | नाही | | |

क. न्यायालयीन साक्षीदार

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| नाही | | | |

सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

अ. सरकारी

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ३६ | तक्रार |
| २. | ४२ | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | ४६ | गोपीनाथ आप्पासाहेब गोरे यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र |
| ४. | ४८ | तपासीक अंमलदार नागरगोजे यांचे मृत्यु प्रमाणपत्र. |

ब. बचाव

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही | | |

क. न्यायालयीन निशाण्या

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही | | |

मुद्देमाल

| क्रमांक | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | १. | एक कोयता. |

:: **न्या य नि र्ण य** ::

(अधिघोषित दिनांक १३.०८.२०२६)

प्रस्तुत खटल्याद्वारे आरोपीची भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ व ५०४ या आरोपाखाली संपरिक्षा घेण्यात आली.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन :–**

०२. तक्रारदार गोपीनाथ आप्पासाहेब गोरे व आरोपी यांचे घर एकमेकांशेजारी असून तक्रारदार यांच्या घराच्या बांधकामाचे साहित्य त्यांच्या व आरोपीच्या घरासमोरील मोकळया जागेत पडलेले होते.

दिनांक ०४.११.२०२३ रोजी सकाळी ०७.४५ वाजताच्या सुमारास मौजे टाकळीवाडी येथे आरोपीची आई सौ. माणिक चव्हाण यांनी तक्रारदार यांच्या बांधकामाच्या साहित्याजवळ जनावरांचे शेण व मलमुत्र टाकले होते. त्यावेळी, तक्रारदार यांची पत्नी सौ. निता गोरे यांनी सौ. माणिक यांना 'तुम्ही येथे घाण का टाकता,' असे विचारले असता, आरोपीने सौ. निता यांना 'आम्ही घाण टाकणार आहे, आमची उपडून घ्या,' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केली. घटनेवेळी तक्रारदार यांनी आरोपीस 'शिवीगाळ का करतोस,' अशी विचारणा केली असता, आरोपीने त्याच्या हातातील कोयत्याने तक्रारदार यांच्या डाव्या हातावर मारुन तक्रारदार यांना मारुन जखमी केले. सदर घटनेबाबत तक्रारदार यांनी दाखल केलेल्या तक्रारीवरुन आरोपीविरुध्द पोलीस ठाणे, कुरुंदवाड येथे भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ व ५०६ या आरोपाखाली गु.र.क्र.३३५/२०२३ नोंदविण्यात आला व पुढील तपास पोलीस नाईक अरुण बालाजी नागरगोजे यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासीक अंमलदार यांनी तपासाअंती आरोपीविरुध्द उपरोक्त नमुद आरोपाखाली न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

०३. दिनांक ०२.०७.२०२४ रोजी आरोपीविरुध्द ३२४ व ५०४ या आरोपाखाली निशाणी क्र.११ वर दोषारोप निश्चित करण्यात आले. सदर दोषारोप आरोपीस त्याच्या भाषेत वाचुन व समजावुन सांगितला असता आरोपीने उक्त दोषारोप नाकारले व संपरीक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

०४. अभिलेखावरील पुराव्यावरुन व दोन्ही पक्षांच्या युक्तिवादावरुन न्यायनिर्णयासाठी उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसासह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे :–

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपीने घटनेवेळी आपसात संगनमत करुन तक्रारदार यांना कोयता या घातक हत्याराने मारहाण करुन ईच्छापुर्वक दुखापत पोहचविली, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली आहे काय ? | ...नाही. |

| | | |
|---|---|---|
| २. | आरोपीने घटनेवेळी आपसात संगनमत करुन तक्रारदार व त्यांची पत्नी निता यांना इच्छापूर्वक शिवीगाळ करुन प्रक्षोभीत केले ज्यायोगे असे प्रक्षोभन तक्रारदार व त्यांच्या पत्नीस शांततेचा भंग करण्यास किंवा अन्य कोणताही अपराध करण्यास प्रवृत्त करणारे होते, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली आहे काय ? | ...नाही. |
| ३. | आदेश काय ? | ...आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

०५. आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने उपरोक्त नमूद प्रपत्र क्र.३२ भाग 'क' यामध्ये नमूद करण्यात आलेल्या साक्षीदारांची साक्ष नोंदविली. त्यानंतर, अभियोगपक्षाचा पुरावा निशाणी क्र.१ वरील आदेशान्वये बंद करण्यात आला. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन निशाणी क्र.४९ वर नोंदविण्यात आले. आरोपीने अभियोगपक्षाचा त्याच्याविरुध्दचा संपूर्ण पुरावा नाकारला आहे.

०६. अभियोगपक्षातर्फे विद्यमान विशेष सहाय्यक सरकारी वकील सु.रा.मिरजे आणि आरोपीतर्फे विद्यमान वकील श्रीमती ध.अ.माने यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

## :: कारणमिमांसा ::

**मुद्दा क्र.१ व २ करीता :-**

०७. उपरोक्त मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे व त्यावरील अभियोगपक्षाचा साक्षीपुरावा एकसारखा असल्यामुळे साक्षीपुराव्याचा पुनरुच्चार टाळण्याकरीता सदर मुद्दे एकत्रीतरित्या विवेचनाकरीता घेण्यात येत आहेत.

०८. तक्रारदार यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक ०४.११.२०२३ रोजी सकाळी ०७.४५ वाजताच्या सुमारास मौजे टाकळीवाडी येथे त्यांच्या घराचे बांधकाम चालू होते व त्यावेळी सदर बांधकामाचे साहित्य आरोपीच्या जागेत ठेवले होते. घटनेवेळी आरोपीची आई सौ. माणिक चव्हाण ही जनावरांचे शेण व मलमुत्र तक्रारदार यांच्या बांधकामाच्या

साहित्याजवळ टाकत असल्यामुळे सदरचे साहित्य खराब होत होते. त्यामुळे, तक्रारदार यांनी सौ. माणिक चव्हाण यांना 'बांधकामाच्या साहित्यावर जनावरांचे शेण व मलमुत्र का टाकत आहात, मला सांगीतले असल्यास मी बांधकामाचे साहित्य काढून घेतलो असतो,' असे म्हटले असता, सौ. माणिक चव्हाण यांनी तक्रारदार यांना 'आम्ही टाकणार, तुम्ही कोण सांगणार, आमची उपडून घ्या,' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केली. घटनेवेळी आरोपी सदर ठिकाणी आला व आरोपीने 'आम्ही टाकणार, तुम्ही कोण सांगणार, आमची उपडून घ्या,' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केली. त्यावेळी, तक्रारदार व सौ. निता (अ.सा.२) यांनी आरोपीस 'का शिवी देतोस,' अशी विचारणा केली असता, आरोपीने सौ. निता (अ.सा.२) यांना 'तु विचारणार कोण, रांड, उंडगे,' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केली. तक्रारदार यांनी आरोपीकडे त्यांचा डावा हात समोर करुन 'का रे शिव्या देतोस,' अशी विचारणा करीत असतेवेळी आरोपीने त्याच्या हातातील कोयत्याने तक्रारदार यांच्या डाव्या हातावर वार केला. त्यामुळे, तक्रारदार यांच्या डाव्या हातावर जखम होवून रक्तस्त्रावर होवू लागला. घटनेनंतर नंदकुमार (अ.सा.३) यांनी तक्रारदार यांना दत्तवाड येथील शासकीय दवाखान्यात उपचाराकरीता नेले होते. सदर दवाखान्यामध्ये तक्रारदार यांच्या डाव्या हातावर टाक्यांची शस्त्रक्रिया करण्यात आली होती. त्यानंतर, तक्रारदार यांनी सदर घटनेबाबत पोलीस ठाण्यामध्ये तक्रार (निशाणी क्र.३६) दाखल केली. घटनेवेळी आरोपीने ज्या कोयत्याने मारहाण केली होती, तो कोयता आर्टीकल 'अ' वर असल्याचे कथन केले आहे.

०९. सौ. निता (अ.सा.२) ह्या तक्रारदार यांच्या पत्नी आहेत. सौ. निता (अ.सा.२) यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक ०४.११.२०२३ रोजी सकाळी ०७.४५ वाजताच्या सुमारास मौजे टाकळीवाडी येथे त्यांच्या घराचे बांधकाम चालू होते व त्यावेळी सदर बांधकामाचे साहित्य आरोपीच्या जागेत ठेवले होते. घटनेवेळी आरोपीची आई सौ. माणिक चव्हाण ही जनावरांचे शेण व मलमुत्र सौ. निता (अ.सा.२) यांच्या बांधकामाच्या साहित्याजवळ टाकत असल्यामुळे सदरचे साहित्य खराब होत होते. त्यामुळे, सौ. निता (अ.सा.२) यांनी सौ. माणिक चव्हाण यांना

'बांधकामाच्या साहित्यावर जनावरांचे शेण व मलमुत्र का टाकत आहात, मला सांगीतले असल्यास मी बांधकामाचे साहित्य काढून घेतलो असतो,' असे म्हटले. त्यावेळी, सौ. माणिक चव्हाण यांनी सौ. निता (अ.सा.२) यांना 'उंडगे, रांड,' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केली असता, सौ. निता (अ.सा.२) यांनी सौ. माणिक चव्हाण यांना 'उंडगे, रांड,' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केली. सदर घटनेवेळी आरोपी घटनास्थळी आला व आरोपीने तक्रारदार यांना 'ए लवडया,' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केली. त्यावेळी, सौ. निता (अ.सा.२) यांनी आरोपीस 'शिवीगाळ करु नको,' असे म्हटले असता, आरोपी हा त्याच्या दारात जावून बसला व आरोपीने सौ. निता (अ.सा.२) यांना 'ए रांड, तुला झवतो ये,' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केली. त्यामुळे, सौ. निता (अ.सा.२) ह्या रडू लागल्या. त्यावेळी, तक्रारदार हे आरोपीस जाब विचारण्याकरीता आरोपीजवळ गेले असता, आरोपीने तक्रारदार यांच्या डाव्या हातावर कोयत्याने वार केला. घटनेवेळी आरोपीने आर्टीकल 'अ' वरील कोयत्याने तक्रारदार यांच्या डाव्या हातावर मारहाण केली नसल्याचे सौ. निता (अ.सा.२) यांनी कथन केले आहे.

१०. नंदकुमार (अ.सा.३) यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, टाकळीवाडी हे त्यांचे आजोळ असून तक्रारदार हे त्यांचे मामा आहेत. दिनांक ०४.११.२०२३ रोजी सकाळी ०७.४५ वाजताच्या सुमारास मौजे टाकळीवाडी येथे तक्रारदार यांच्या घरामध्ये नंदकुमार (अ.सा.३) हे हजर होते. त्यावेळी, सौ. निता (अ.सा.२) व सौ. माणिक यांच्या समाईक जागेमध्ये जनावरांचे शेण व मलमुत्र टाकण्याच्या कारणावरून त्या दोघींमध्ये वादावादी चालू होती. त्यावेळी, आरोपीने तक्रारदार यांना 'तुझ्या आईला झवतो, ये इकडे,' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केली. तसेच, आरोपीने त्याच्या हातातील कोयत्याने तक्रारदार यांच्या डाव्या हातावर मारहाण केली. त्यामुळे, तक्रारदार यांच्या डाव्या हाताला जखम झाली. घटनेनंतर तक्रारदार यांना दत्तवाड येथील शासकीय दवाखान्यात उपचाराकरीता नेण्यात आले होते. घटनेवेळी आरोपीने ज्या कोयत्याने तक्रारदार यांच्या डाव्या हातावर वार केला होता, तो कोयता आर्टीकल 'अ' वर असल्याचे नंदकुमार (अ.सा.३) यांनी कथन केले आहे.

११. संभाजी (अ.सा.५) यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक ०४.११.२०२३ रोजी सकाळी ०७.४५ वाजताच्या सुमारास ते त्यांच्या शेताकडे जात होते. त्यावेळी, आरोपी हा तक्रारदार यांच्या घराजवळ शेण व मलमुत्र टाकत असल्यामुळे आरोपीच्या घराजवळ तक्रारदार व आरोपीचे भांडण चालू होते. त्यावेळी, आरोपीने सौ. निता (अ.सा.२) यांना 'तुला झवतो,' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केली. त्यामुळे, तक्रारदार यांनी आरोपीस 'अशी का शिवीगाळ करतोस,' अशी विचारणा केली असता, आरोपीने तक्रारदार यांच्या डाव्या हातावर कोयत्याने वार केला. सदर घटनेनंतर संभाजी (अ.सा.५) यांनी तक्रारदार यांना दत्तवाड येथील शासकीय दवाखान्यात उपचाराकरीता नेले होते. तक्रारदार यांच्या डाव्या हातावर टाक्यांची शस्त्रक्रिया करण्यात आली होती. घटनेवेळी आरोपीने ज्या कोयत्याने तक्रारदार यांच्या डाव्या हातावर वार केला होता, तो कोयता आर्टीकल 'अ' वर असल्याचे संभाजी (अ.सा.५) यांनी कथन केले आहे.

१२. डॉ. आदेश (अ.सा.६) यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, मागील तीन वर्षांपासून वैद्यकीय अधिकारी या पदावर ते कार्यरत आहेत. दिनांक ०४.११.२०२३ रोजी सकाळी ०८.३० वाजताच्या सुमारास तक्रारदार हे ग्रामिण रुग्णालय, दत्तवाड येथे वैद्यकिय उपचाराकरीता आले होते. तक्रारदार यांच्या घराजवळ त्यांच्यावर अज्ञात इसमाने चॉपरने हल्ला करण्यात आल्याबाबत डॉ. आदेश (अ.सा.६) यांना सांगण्यात आले होते. डॉ. आदेश (अ.सा.६) यांनी तक्रारदार यांची वैद्यकीय तपासणी केली असता, तक्रारदार यांच्या डाव्या हाताच्या तळव्यावर अनुक्रमे ३ x २ x ०.५ सेमी व २ x १ x ०.५ सेमी अशा आकाराच्या दोन जखमा डॉ. आदेश (अ.सा.६) यांना आढळून आल्या. सदर दोन्ही जखमा साध्या स्वरुपाच्या असून उक्त जखमा तीक्ष्ण वस्तूने चोवीस तासाच्या आत झालेल्या होत्या. सदर जखमा आर्टीकल 'अ' वरील कोयत्याने होवू शकत असल्याबाबत डॉ. आदेश (अ.सा.६) यांनी कथन केले आहे. तक्रारदार यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र (निशाणी क्र.४६) निर्गमित केल्याचे डॉ. आदेश (अ.सा.६) यांनी कथन केले आहे.

१३. पंच स्वप्नील (अ.सा.४) यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक ०४.११.२०२३ रोजी पोलीसांनी त्यांना पंचनाम्याकरीता मौजे टाकळीवाडी येथे धनपाल चव्हाण यांच्या घरासमोर पंच म्हणून बोलाविले होते. त्यावेळी, पंच स्वप्नील (अ.सा.४) यांच्यासोबत धनपाल चव्हाण, आरोपी, तक्रारदार, दुसरा पंच नितीन शिंदे व पोलीस कर्मचारी हजर होते. तक्रारदार यांनी पंचांना घटनास्थळ दाखविले होते. पोलीसांनी पंचांसमक्ष घटनास्थळावरुन एक कोयता जप्त करुन घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.४२) सायंकाळी ०५.०० वाजता सुरु करुन सायंकाळी ०६.०० वाजता संपविला. घटनास्थळाच्या पूर्वेस व उत्तरेस अशोक पाटील यांचे घर, दक्षिणेस टाकळीवाडी ते दत्तवाड जाणारा रस्ता व पश्चिमेस चव्हाण यांची रिकामी जागा आहे. घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.४२) याद्वारे जप्त केलेला कोयता आर्टीकल 'अ' वर असल्याचे पंच स्वप्नील (अ.सा.४) यांनी कथन केले आहे.

१४. विद्यमान विशेष सहाय्यक सरकारी वकील यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये नमूद केले आहे की, अभियोगपक्षाच्या साक्षीदारांनी आरोपीविरुध्द ठोस पुरावा दिला असून अभियोगपक्षाने सदर साक्षीदारांच्या साक्षीपुराव्यातून आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयापलीकडे सिद्ध केला आहे. त्यामुळे, आरोपीना कायद्याप्रमाणे कडक शिक्षा ठोठावण्यात यावी, अशी विनंती त्यांनी केली आहे.

१५. याउलट, आरोपीचे विद्यमान वकील यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये नमूद केले आहे की, तथाकथीत घटनेच्या महत्वपूर्ण बाबींसंदर्भातील अभियोगपक्षाच्या प्रमुख साक्षीदारांचा साक्षीपुरावा एकमेकांशी कमालीचा विसंगत आहे. त्यामुळे, अभियोगपक्षाच्या प्रमुख साक्षीदारांच्या साक्षीपुराव्याबाबत साशंकता निर्माण होत आहे. पंच स्वप्नील (अ.सा.४) व डॉ. आदेश (अ.सा.६) यांचा साक्षीपुरावा औपचारिक, साधारण व मोघम आहे. तपासीक अंमलदार नागरगोजे व पंच नितीन यांच्या साक्षीपुराव्याअभावी अभियोगपक्षास घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.४२) संशयापलिकडे सिध्द करता आला नाही. त्यामुळे, अभियोगपक्षाच्या एकूण कथनाबाबत साशंकता निर्माण होत आहे. सबब,

अभियोगपक्षास आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयापलीकडे सिद्ध करता आला नाही. त्यामुळे, आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात यावी, असा युक्तिवाद आरोपीचे विद्यमान वकील यांनी केला आहे.

१६. तक्रारदार यांच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता, तथाकथीत घटनेवेळी आरोपीच्या आईने तक्रारदार यांना 'आम्ही टाकणार, तुम्ही कोण सांगणार, आमची उपडून घ्या,' अशी शिवीगाळ केल्याची बाब तक्रार (निशाणी क्र.३६) दाखल करतेवेळी पोलीसांना सांगीतल्याचे तक्रारदार यांनी कथन केल्याचे दिसून येत आहे. तसेच, तथाकथीत घटनेवेळी आरोपीने सौ. निता (अ.सा.२) यांना 'तु विचारणार कोण, रांड, उंडगे,' अशी शिवीगाळ केल्याची बाब तक्रार (निशाणी क्र.३६) दाखल करतेवेळी पोलीसांना सांगीतल्याचे तक्रारदार यांनी कथन केले आहे. घटनेनंतर नंदकुमार (अ.सा.३) यांनी तक्रारदार यांना दत्तवाड येथील शासकीय दवाखान्यात उपचाराकरीता नेल्याची बाब तक्रार (निशाणी क्र.३६) दाखल करतेवेळी पोलीसांना सांगीतल्याचे तक्रारदार यांनी कथन केले आहे. उपरोक्त नमूद बाबी पोलीसांनी तक्रार (निशाणी क्र.३६) यामध्ये का नमूद केल्या नाहीत, याचे कारण सांगता येत नसल्याचे तक्रारदार यांनी कथन केले आहे. उपरोक्त नमुद महत्वपूर्ण बाबी तक्रारदार यांनी तक्रार (निशाणी क्र.३६) दाखल करतेवेळी पोलीसांना सांगीतल्या नसल्याचे व सदर बाबींसंदर्भात त्यांनी न्यायालयासमक्ष साक्षीपुराव्यादरम्यान पहिल्यांदाच भाष्य केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, उपरोक्त नमूद बाबींसंदर्भातील तक्रारदार यांच्या साक्षीपुराव्याबाबत साशंकता निर्माण होत आहे.

१७. सौ. निता (अ.सा.२) यांच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता, घटनेवेळी आरोपीच्या आईने त्यांना 'उंडगे, रांड,' अशी शिवीगाळ केल्याची बाब पोलीसांना जबाब देतेवेळी सांगीतल्याचे त्यांनी कथन केल्याचे दिसून येत आहे. आरोपीच्या आईस 'उंडगे, रांड,' अशी शिवीगाळ केल्याची बाब पोलीसांना जबाब देतेवेळी सांगीतल्याचे सौ. निता (अ.सा.२) यांनी कथन केले आहे. आरोपीने तक्रारदार यांना 'ए लवडया,' अशी शिवीगाळ केल्याची बाब पोलीसांना जबाब देतेवेळी सांगीतल्याचे सौ. निता (अ.सा.२) यांनी कथन केले आहे. घटनेवेळी शिवीगाळ करु नको, असे आरोपीस म्हटल्याची बाब

पोलीसांना जबाब देतेवेळी सांगीतल्याचे सौ. निता (अ.सा.२) यांनी कथन केले आहे. आरोपी हा त्याच्या दारात जावून बसला व आरोपीने सौ. निता (अ.सा.२) यांना 'ए रांड, तुला झवतो ये,' अशी शिवीगाळ केल्याची बाब पोलीसांना जबाब देतेवेळी सांगीतल्याचे सौ. निता (अ.सा.२) यांनी कथन केले आहे. आरोपीने सौ. निता (अ.सा.२) यांना शिवीगाळ केल्यामुळे त्या रडू लागल्याची बाब पोलीसांना जबाब देतेवेळी सांगीतल्याचे सौ. निता (अ.सा.२) यांनी कथन केले आहे. उपरोक्त नमूद महत्वपूर्ण बाबी पोलीसांनी जबाबामध्ये का नमुद केल्या नाहीत, याचे कारण सांगता येत नसल्याचे सौ. निता (अ.सा.२) यांनी कथन केले आहे. उपरोक्त नमूद बाबी जबाब देतेवेळी पोलीसांना सांगून देखील पोलीसांनी सदर बाबी जबाबामध्ये लिहिल्या नसल्याचे सौ. निता (अ.सा.२) यांनी कथन केले असले तरी त्याबाबत त्यांनी पोलीसांकडे जाब विचारला नसल्याचे कथन केले आहे. सबब, उपरोक्त नमुद महत्वपूर्ण बाबी सौ. निता (अ.सा.२) पोलीसांना जबाब देतेवेळी सांगीतल्या नसल्याचे व सदर बाबींसंदर्भात त्यांनी न्यायालयासमक्ष साक्षीपुराव्यादरम्यान पहिल्यांदाच भाष्य केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, उपरोक्त नमूद बाबींसंदर्भातील सौ. निता (अ.सा.२) यांच्या साक्षीपुराव्याबाबत साशंकता निर्माण होत आहे.

१८. नंदकुमार (अ.सा.३) यांच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता, घटनेवेळी आरोपीने तक्रारदार यांना 'तुझ्या आईला झवतो, ये इकडे,' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याची बाब पोलीसांना जबाब देतेवेळी सांगीतली नसल्याबाबत नंदकुमार (अ.सा.३) यांनी कथन केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, उपरोक्त नमुद महत्वपूर्ण बाब नंदकुमार (अ.सा.३) पोलीसांना जबाब देतेवेळी सांगीतली नसल्याचे व सदर बाबीसंदर्भात त्यांनी न्यायालयासमक्ष साक्षीपुराव्यादरम्यान पहिल्यांदाच भाष्य केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, उपरोक्त नमूद बाबीसंदर्भातील नंदकुमार (अ.सा.३) यांच्या साक्षीपुराव्याबाबत साशंकता निर्माण होत आहे. तसेच, तथाकथीत घटनेवेळी सौ. निता (अ.सा.२) व सौ. माणिक यांच्या समाईक जागेमध्ये जनावरांचे शेण व मलमुत्र टाकण्याच्या कारणावरून त्या दोघींमध्ये वादावादी चालू झाल्याचे नंदकुमार (अ.सा.३) यांनी त्यांच्या सरतपासामध्ये कथन केले असले तरी, तक्रारदार व

आरोपीची समाईक जागा नसल्याचे व तथाकथीत जागा आरोपीच्या मालकीची असल्याची बाब त्यांनी त्यांच्या उटतपासामध्ये कबूल केली आहे. सबब, नंदकुमार (अ.सा.३) यांच्या साक्षीपुराव्यातील उपरोक्त नमूद महत्वपूर्ण त्रुटीमुळे त्यांच्या साक्षीपुराव्याबाबत साशंकता निर्माण होत आहे.

१९. संभाजी (अ.सा.५) यांच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता, तथाकथीत घटनेवेळी आरोपीने सौ. निता (अ.सा.२) यांना 'तुला झवतो,' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याची बाब पोलीसांना जबाब देतेवेळी सांगीतली नसल्याबाबत संभाजी (अ.सा.५) यांनी कथन केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, उपरोक्त नमुद महत्वपूर्ण बाब संभाजी (अ.सा.५) पोलीसांना जबाब देतेवेळी सांगीतली नसल्याचे व सदर बाबीसंदर्भात त्यांनी न्यायालयासमक्ष साक्षीपुराव्यादरम्यान पहिल्यांदाच भाष्य केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, उपरोक्त नमूद बाबीसंदर्भातील संभाजी (अ.सा.५) यांच्या साक्षीपुराव्याबाबत साशंकता निर्माण होत आहे.

२०. तथाकथीत घटनेवेळी आरोपीने सौ. निता (अ.सा.२) यांना 'तु विचारणार कोण, रांड, उंडगे,' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचे तक्रारदार यांनी कथन केले आहे. याउलट, तथाकथीत घटनेवेळी आरोपीने सौ. निता (अ.सा.२) यांना 'ए रांड, तुला झवतो ये,' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचे सौ. निता (अ.सा.२) यांनी कथन केले आहे. तसेच, तथाकथीत घटनेवेळी आरोपीने सौ. निता (अ.सा.२) यांना 'तुला झवतो,' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचे संभाजी (अ.सा.५) यांनी कथन केले आहे. सबब, तथाकथीत घटनेवेळी आरोपीने सौ. निता (अ.सा.२) यांना नेमकी कोणती शिवीगाळ केली, याबाबतच्या तक्रारदार, सौ. निता (अ.सा.२) व संभाजी (अ.सा.५) यांच्या साक्षीपुराव्यामध्ये कमालीची विसंगती असल्याचे दिसून येत आहे. तथाकथीत घटनेवेळी आरोपीच्या आईने तक्रारदार यांना शिवीगाळ केल्याबाबत तक्रारदार यांनी कथन केले असले तरी, सदर महत्वपूर्ण कथनास सौ. निता (अ.सा.२), नंदकुमार (अ.सा.३) व संभाजी (अ.सा.५) यांच्या साक्षीपुराव्यातून पुष्टी मिळत नसल्याचे दिसून येत आहे. आरोपीने तक्रारदार यांना 'ए लवडया,' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ

केल्याचे सौ. निता (अ.सा.२) यांनी कथन केले आहे. याउलट, आरोपीने तक्रारदार यांना 'तुझ्या आईला झवतो, ये इकडे,' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचे नंदकुमार (अ.सा.३) यांनी कथन केले आहे. सबब, तथाकथीत घटनेवेळी आरोपीने तक्रारदार यांना नेमकी कोणती शिवीगाळ केली, याबाबतच्या सौ. निता (अ.सा.२) व नंदकुमार (अ.सा.३) यांच्या साक्षीपुराव्यामध्ये कमालीची विसंगती असल्याचे दिसून येत आहे. महत्वाचे म्हणजे, सौ. निता (अ.सा.२) व नंदकुमार (अ.सा.३) यांच्या उपरोक्त नमुद कथनास तक्रारदार  व संभाजी (अ.सा.५) यांच्या साक्षीपुराव्यातून पुष्टी मिळत नसल्याचे दिसून येत आहे. तथाकथीत घटनेवेळी आरोपीच्या आईने सौ. निता (अ.सा.२) यांना व सौ. निता (अ.सा.२) यांनी आरोपीच्या आईस अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचे सौ. निता (अ.सा.२) यांनी कथन केले असले तरी, सदर महत्वपूर्ण कथनास तक्रारदार, नंदकुमार (अ.सा.३) व संभाजी (अ.सा.५) यांच्या साक्षीपुराव्यातून पुष्टी मिळत नसल्याचे दिसून येत आहे. घटनेवेळी आरोपीने ज्या कोयत्याने तक्रारदार यांच्या डाव्या हातावर वार केला होता, तो कोयता आर्टीकल 'अ' वर असल्याचे तक्रारदार, नंदकुमार (अ.सा.३) व संभाजी (अ.सा.५) यांनी कथन केले आहे. याउलट, घटनेवेळी आरोपीने आर्टीकल 'अ' वरील कोयत्याने तक्रारदार यांच्या डाव्या हातावर वार केला नसल्याचे सौ. निता (अ.सा.२) यांनी कथन केले आहे. सबब, वरील सर्व बाबींचा विचार करता, तथाकथीत घटनेच्या महत्वपूर्ण बाबींसंदर्भातील तक्रारदार, सौ. निता (अ.सा.२), नंदकुमार (अ.सा.३) व संभाजी (अ.सा.५) यांचा साक्षीपुरावा एकमेकांशी कमालीचा विसंगत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, सदर साक्षीदारांच्या एकूण साक्षीपुराव्याबाबत व अभियोगपक्षाच्या कथनाबाबत साशंकता निर्माण होत आहे.

२१. पंच स्वप्नील (अ.सा.४) यांच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता, त्यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यादरम्यान तथाकथीत घटनास्थळाच्या चतु:सिमेसंदर्भातील केलेले कथन व घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.४२) यामध्ये नमूद असणा–या तथाकथीत घटनास्थळाच्या चतु:सिमा, यामध्ये कमालीची विसंगती असल्याचे दिसून येत आहे. घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.४२) याद्वारे जप्त

करण्यात आलेल्या कोयत्याचे सविस्तर वर्णन तथा विवरण, याबाबत पंच स्वप्नील (अ.सा.४) यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये काहीही भाष्य केले नाही. सबब, पंच स्वप्नील (अ.सा.४) यांच्या साक्षीपुराव्यातील उपरोक्त नमुद त्रुटींमुळे अभियोगपक्षास पंच स्वप्नील (अ.सा.४) यांच्या साक्षीपुराव्यातून घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.४२) संशयापलिकडे सिध्द करता आला नाही. तपासीक अंमलदार नागरगोजे हे मयत असल्याबाबत त्यांचे मृत्यु प्रमाणपत्र पोलीसांनी निशाणी क्र.४८ वर दाखल केल्यामुळे अभियोगपक्षास तपासीक अंमलदार नागरगोजे यांची साक्ष अभिलेखावर नोंदविता आली नाही. सबब, पंच स्वप्नील (अ.सा.४) यांच्या साक्षीपुराव्यातील उपरोक्त नमुद त्रुटींमुळे आणि दुसरे पंच नितीन व तपासीक अंमलदार नागरगोजे यांच्या साक्षीपुराव्याअभावी अभियोगपक्षास घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.४२) संशयापलिकडे सिध्द करता आला नाही.

२२. डॉ. आदेश (अ.सा.४) यांच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता, तक्रारदार यांच्या वैद्यकीय तपासणीची तारीख व वेळ आणि तक्रारदार यांना जखम कशी झाली, याबाबत डॉ. आदेश (अ.सा.४) यांना सांगण्यात आलेला मजकूर, यांचा तपशिल तक्रारदार यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र (निशाणी क्र.४६) यामध्ये लिहिण्यात आला नसल्याची बाब डॉ. आदेश (अ.सा.४) यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये कबूल केली असल्याचे दिसून येत आहे. महत्वाचे म्हणजे, डॉ. आदेश (अ.सा.४) यांनी साक्षीपुराव्याकामी येतेवेळी तक्रारदार यांचे दवाखान्यातील केसपेपर्स व मुळ एमएलसी नोंदवही सोबत आणली नसल्याचे कथन केले आहे. वैद्यकीय तपासणीवेळी तक्रारदार यांचे आधारकार्ड पाहून तक्रारदार यांच्या ओळखीबाबत खात्री केली नसल्यामुळे दिनांक ०४.११.२०२३ रोजी ज्या इसमास तपासले होते, तो इसम तक्रारदारच असल्याचे खात्रीपुर्वक सांगू शकत नसल्याचे डॉ. आदेश (अ.सा.४) यांनी कथन केले आहे. महत्वाचे म्हणजे, वैद्यकीय प्रमाणपत्र (निशाणी क्र.४६) यामध्ये नमूद असणा-या जखमा आर्टीकल 'अ' वरील कोयत्याने होवू शकत असल्याबाबत खात्रीपुर्वक सांगू शकत नसल्याचे डॉ. आदेश (अ.सा.४) यांनी कथन केले आहे. तक्रारदार यांच्या घराजवळ त्यांच्यावर अज्ञात इसमाने चॉपरने हल्ला

करण्यात आल्याबाबत वैद्यकीय तपासणीवेळी सांगण्यात आल्याचे डॉ. आदेश (अ.सा.६) यांनी त्यांच्या सरतपासामध्ये कथन केले आहे. परंतू, आर्टीकल 'अ' वरील कोयता हा चॉपर नसल्याचे डॉ. आदेश (अ.सा.६) यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये कथन केले आहे. सबब, डॉ. आदेश (अ.सा.६) यांच्या साक्षीपुराव्यातील महत्वपूर्ण त्रुटींमुळे अभियोगपक्षास डॉ. आदेश (अ.सा.६) यांच्या साक्षीपुराव्यातून तक्रारदार यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र (निशाणी क्र.४६) आणि सदर वैद्यकीय प्रमाणपत्रातील नमूद जखमा आर्टीकल 'अ' वरील कोयत्याने होवू शकत असल्याची बाब संशयापलीकडे सिध्द करता आली नाही.

२३. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांच्या एकूण साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता, तक्रारदार, सौ. निता (अ.सा.२), नंदकुमार (अ.सा.३), पंच स्वप्नील (अ.सा.४), संभाजी (अ.सा.५) व डॉ. आदेश (अ.सा.६) यांचा साक्षीपुरावा औपचारीक, साधारण व मोघम असून सदर साक्षीदारांनी त्यांच्या साक्षीपुराव्यातून आरोपीविरुध्द कोणताही ठोस तथा सबळ पुरावा दिला नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, अभियोगपक्षाच्या एकूण साक्षीपुराव्याबाबत साशंकता निर्माण होत आहे.

२४. वरील विवेचनावरुन असे दिसुन येते की, तक्रारदार, सौ. निता (अ.सा.२), नंदकुमार (अ.सा.३), पंच स्वप्नील (अ.सा.४), संभाजी (अ.सा.५) व डॉ. आदेश (अ.सा.६) यांच्या साक्षीपुराव्यातील उपरोक्त नमूद महत्वपूर्ण त्रुटी व विसंगतींमुळे तसेच, तपासीक अंमलदार नागरगोजे व पंच नितीन यांच्या साक्षीपुराव्याअभावी अभियोगपक्षास आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयापलीकडे सिध्द करण्याकरीता कोणताही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष तसेच सुसंगत असा सबळ पुरावा अभिलेखावर आणता आला नाही. सबब, अभियोगपक्षास आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेल्या अपराधांची मुलतत्वे संशयापलीकडे सिध्द करता आली नाहीत. त्यामुळे, मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर मी नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.३ करीता</u> :-**

२५. अभियोगपक्षाच्या एकुण साक्षीपुराव्यावरुन आरोपीविरुध्द कोणताही गुन्हा संशयापलीकडे

सिध्द होत नाही. त्यामुळे, आरोपीस संशयाचा फायदा देऊन त्याची प्रस्तुत गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होईल. सबब, मुद्दा क्र.३ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

:: **आ दे श** ::

१. आरोपी अरुण धनपाल चव्हाण याची भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ व ५०४ या गुन्ह्यातुन फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन कद्‌बे रद्द करण्यात येतात.

३. जप्त मुद्देमाल एक कोयता हा मुल्यहिन व निरुपयोगी असल्यामुळे सदर मुद्देमाल अपीलीय कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ च्या पुर्ततेसाठी सहा महिने कालावधीकरीता रक्कम रुपये १५,०००/– किंमतीचे वैयक्तीक व तितक्याच रकमेचे एका जामीनदाराचे बंधपत्र द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2026.08.13 18:04:56 +0530

दिनांक : १३.०८.२०२६.
कुरुंदवाड.

(बाळासाहेब श्री. गायकवाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, कुरुंदवाड.